राज्य शासनाच्या विविध विभाग/ महामंडळांमार्फत कौशल्य व उद्योजकता विकास तसेच क्षमता वृध्दींगत (Capacity Building) करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे केंद्रीकरण व एकसुत्रिकरण (convergence) करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१७/प्र.क्र.१४९/अभियान-१,**
**२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : ०५ एप्रिल, २०१८**

**प्रस्तावना :**

Maharashtra State Innovative Start-up Policy २०१८ च्या मसुद्यास मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेच्या कार्यवाही दरम्यान राज्य शासनाच्या विविध विभाग/महामंडळांमार्फत ग्रामिण व शहरी भागातील उमेदवारांना कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण देणे तसेच कौशल्य व उद्योजकता विकास करण्याची क्षमता वृध्दींगत करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांचे पुनरावलोकन करून द्विरूक्ती टाळण्यासाठी योजनांचे केंद्रीकरण व सुसुत्रिकरण (convergence) करण्यासाठी अपर मुख्य सचिव, उद्योग यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या प्रतिनिधींची उच्चस्तर समिती गठीत करण्याबाबत वित्त विभागाने सूचित केले होते. विभागाने मा. मंत्रिमंडळास Maharashtra State Innovative Start-up Policy २०१८ चा मसुदा मान्यतेसाठी सादर करतेवेळी वित्त विभागाच्या उक्त अभिप्रायास सहमती दर्शविलेली होती.

या अनुषंगाने विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या कौशल्य व उद्योजकता विकासाच्या योजनांचे केंद्रीकरण व एकसुत्रिकरण (convergence) करण्यासाठी अपर मुख्य सचिव, उद्योग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य शासनाच्या विविध विभाग/महामंडळांमार्फत कौशल्य व उद्योजकता विकास तसेच त्या संदर्भातील क्षमता वृध्दींगत (Capacity Building) करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे केंद्रीकरण व एकसुत्रिकरण (convergence) करण्यासाठी अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांचा समावेश असलेली उच्चस्तरीय समिती या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव (उद्योग) | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव (कृषी) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यसंवर्धन विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव | सार्वजनिक आरोग्य | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव | नियोजन | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव, परिवहन व बंदरे | गृह विभाग | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव | नगर विकास विभाग | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव (कामगार) | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव | अल्पसंख्यांक विकास विभाग | सदस्य |
| १० | प्रधान सचिव | वित्त विभाग (वित्तीय सुधारणा) | सदस्य |
| ११. | सचिव (वस्त्रोद्योग) | वस्त्रोद्योग विभाग | सदस्य |
| १२. | सचिव | महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| १३. | सचिव (पदूम) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यसंवर्धन विभाग | सदस्य |
| १४. | सचिव | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १५. | सचिव | विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग | सदस्य |
| १६. | प्रधान सचिव | आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| १७. | सचिव (वने) | महसूल व वन विभाग | सदस्य |
| १८. | सचिव | पंचायत राज व ग्रामविकास विभाग | सदस्य |
| १९. | मुख्य कार्यकारी अधिकारी | महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी | सदस्य |
| २०. | उपसचिव | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | सदस्य सचिव |

२. उक्त समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील.

राज्य शासनाच्या विविध विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील महामंडळामार्फत कौशल्य/उद्योजकता विकास तसेच कौशल्य/उद्योजकता विकासाच्या Capacity Building करीता राबविण्यात येणाऱ्या योजनांचे पुनरावलोकन करून द्विरुक्ती टाळण्यासाठी, योजनांचे केंद्रीकरण व सुसुत्रिकरण (Convergence) करण्याबाबत मा. मंत्रिमंडळास शिफारस करणे.

३. सदरहू समिती मार्फत एक महिन्यामध्ये अहवाल सादर करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०४०५१६४६३६६३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Wasudev Gawande

Digitally signed by Gajanan Wasudev Gawande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=598b4111a7392ee0c9038cf4c426c1f9ef65d75e9ac67ec77c38a9c5895cc932, serialNumber=92cce2bddffe9d1b98d5b31109f5f81e224273580cfca2f478d921078212cf69, cn=Gajanan Wasudev Gawande
Date: 2018.04.05 16:48:36 +05'30'

**( गजानन वा.गावंडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व संबंधित मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. निवड नस्ती. (अभियान-१).